रे. दिवाणी मुकदमा क्र. १९९/२०२० मधील निशाणी क्र.२९ वरील आदेश

(मनिषा मोरे व. वि कासाबाई पवार व.)

(CNR No. MHSN130007712020)

१. वादी यांनी सदरचा दावा हा प्रवादी क्र. १ ते ६ यांचेविरुध्द निरंतर मनाईसाठी व वाटप होवून हिस्सा अलग होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला होता. त्या अंतर्गत नि.५ वर तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकामी अर्ज दाखल केलेला होता. त्यानंतर एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेश २९/१२/२०२० रोजी अदा करणेत आला. प्रवादी क्र. १ यानी त्यानंतर ता. ३१/१२/२०२० रोजीच्या खरेदीपत्राने प्रवादी क्र.७ यांचे नांवे खरेदीपत्र करुन दिले. ते खरेदीपत्र ता. ५/१/२०२१ रोजी नोंदविणेत आले. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दावा दाखल केला असलेची माहिती व एकतर्फी तुर्तातुर्त मनाई असलेबाबतची माहीती प्रवादी यांना असतानाही जाणीवपूर्वकरीत्या प्रवादी क्र.७ यांच्या नांवे खरेदीपत्र नोंदविणेत आले. वादी यांनी त्यामुळे त्यांनाही या दावेचे कामी सामील करुन घेतलेले आहे. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा प्रलंबित असताना प्रवादी क्र.७ यांनी कोणताही कब्जा नसताना वादींना दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा केला तर वादींचे नुकसान संभवते.

२. वादी यांनी या दावेचे कामी नि.२८ च्या यादीसोबत खरेदीपत्राचा दस्त दाखल केलेला आहे. सदरचा दस्त ता. ३१/१२/२०२० चा जरी दाखवला असला तरी ५/१/२०२१ रोजी नोंदवला असलेचे दिसून येते. निश्चितच त्या तारखेला प्रवादी क्र.७ हा दावा मिळकतीच्या कब्जात नसलेचे यावरुन स्पष्ट होते. अशा परिस्थितीमध्ये जर वादी यांना दावा मिळकतीतून हरकत अडथळा करुन हुसकावून दिलेस वादीचा दावा

निरर्थक ठरु शकतो व दावा मिळकतीचे नुकसान होवू शकते. त्यामुळे प्रवादी क्र.७ यांनी वादी यांना दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करु नये म्हणून एकतर्फी तुर्तातर्त मनाई आदेशाद्वारे ता. ०१/०३/२०२१ पर्यंत मनाई करणेत येते.

३.        एकतर्फी तुर्तातुर्त मनाई आदेशाची नोटीस प्रवादी क्र.७ यांना देणेत यावी ज्याची परताव्याची तारीख ०१/०३/२०२१.

४.        वादी यांनी सी.पी.सी ऑर्डर ३९ रुल ३ प्रमाणे पुर्तता करुन घ्यावी.

Digitally signed by Vijay Ramchandra Gharal
Date: 2021.01.30 11:17:20 +05'30'

कडेगांव                                        (वि.रा. घराळ)
दिनांक – २९/०१/२०२१                दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.G. Buchade, (Grade III) |
| Court | : Civil Judge, Jr. Dn., & J.M.F.C., Kadegaon |
| Date | : 29/01/2021 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 29/01/2021 |
| Order uploaded on | : 30/01/2021 |